

सांगली : गुरुकुलमध्ये गाणी सादर करताना शिष्य आणि तबलावादक नीलेश काळे.

# गुरुकुलात रंगला गुरुपूजन सोहळा

**सांगली, ता. २८ :** आयुष्यात गुरूचे स्थान अत्यंत मोलाचे असते. गुरू आणि शिष्याचे नाते जीवनाला दिशा देऊन जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर गुरूकडून शिकत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन हळद व बेदाणा व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते मनोहर सारडा यांनी केले.

येथील संगीताचार्य द. वि. काणेबुवा प्रतिष्ठान संचालित गुरुकुल संगीत विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. श्री. सारडा म्हणाले, "गुरुकुलच्या माध्यमातून सांगलीत संगीताचे ज्ञान देणारे व्यासपीठ निर्माण झाले आहे. या संस्थेच्या सदैव पाठीशी राहू."

संचालिका मंजुषा पाटील यांच्याहस्ते सरस्वती पूजन आणि गुरू पूजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. गुरुकुलमधील मुलांनी राग भूप, यमन बिहाग रागासह बंदिशी सादर केल्या. ज्येष्ठ शिष्यांनीही यावेळी गायन सेवा केली. नीलेश काळे यांनी तबलासाथ केली. संचालिका मंजुषा पाटील यांनी भैरवी सादर केली. पुष्कर नाशिककर, सौम्य कोटणीस, तन्मयी जोशी, शांभवी कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संस्थेचे अध्यक्ष गोविंद बेडेकर, निवासी गुरू कृष्णा मुखेडकर, राहुल पाटील यांच्यासह पालक उपस्थित होते.

Scanned with CamScanner